## 6.1.1 VISION, MISSION & NATURE OF GOVERNANCE

Rashtriya Shikshan Mandal is the parent body and also the supreme advisory body in academics as well as administration. Local managing committee, Principal of the college along with 2 vice principals altogether work to promote better educational system. Education, training and research are the main domain of Mahavidyalaya, through clinical exposure at the hospital which is NABH accredited and a few NGO's, institute provides good infrastructure, well equipped lab and research facilities for the same.

The vision of Tilak Ayurved Mahavidyalaya is to be an academic institute of global excellence delivering authentic knowledge of Ayurveda with evidence based research and the mission is to create competent Ayurvedic healthcare professionals with authentic knowledge of Ayurveda by means of new age research & innovation with knowledge based contribution, provision of digital platform for better learning and participating in campaigns like Make in India.

Valuable direction by governance in the form of perspective yearly planner is provided to the principal. In accordance with that the activities are carried out by the various committees of the institute.

**Role of the HOD and Faculties** – Monitoring the progression of the students by periodic assessment with reference to their special area of interest, running research activities framed by the Research advisory committee to carry out research program on traditional as well as modern tools. By following student's progression students can be helped from the time they get admitted to institute right through placement. 360' Feedback from the stakeholders viz. teachers, students, alumni are taken for the betterment of the institute.

Tilak being an institute of the highest excellence, many students have been achieving various felicitations from time to time including gold medals at the university level. This institute has maintained a good rapport with the society as well as helping the community in various social areas and issues. Various medical camps are organized to serve the community in the best possible way for example, Sanitation, Women health and empowerment, Gender sensitization, Ashadhi wari free medical camp etc.

Student's special interest in Sports & Cultural activities is also taken into consideration to help them grow through personality development and professional leadership. Participation in various competitions at university and inter-university level helps them in building good social character.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

Financial management by governance is provided to carry out different projects. And through these various activities institute is promoting skill based learning, earning its fame and recognition at global level. Tilak Ayurved Mahavidyalaya will undoubtedly be an ideal institution for leadership, entrepreneurship & academic excellence in the future, without question!

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

2019/372
30/03/2019

सभा क्रमांक २०१९ / १

## टिळक आयुर्वेद महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समिती - सभेची सूचना

दि.२९.०३.२०१९

प्रति,

मा.अध्यक्ष / मा.सदस्य,

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, स्थानिक व्यवस्थापन समिती, पुणे यांसी,

मा.डॉ. वि.वि.डोईफोडे
अध्यक्ष (पदसिद्ध)
टि.आ.म.वि.समिती पुणे

महोदय,

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा **गुरुवार, दि.११.०४.२०१९** रोजी **दुपारी १२.३० वा.** मा.अध्यक्षांच्या परवानगीने प्राचार्यकक्षामध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. आपण सभेस उपस्थित राहावे, ही विनंती.

आपला,

(डॉ.सदानंद वि.देशपांडे)
प्राचार्य / सचिव,
टि.आ.म.वि. स्थानिक व्यवस्थापन समिती.

सभेपुढील विषय -

१. मागील सभा दि.१५.१२.२०१८ क्र.२०१८/५ च्या सभावृत्ताचे वाचन व मंजूरी.
२. सभा क्र.२०१८/५, दि.१५.१२.२०१८ रोजी झालेल्या सभेतील निर्णयांवरील कार्यवाहीची माहिती.
३. सभा क्र.२०१८/५, दि.१५.१२.२०१८ नंतरच्या ठळक घटना व सामान्य अहवाल.
४. माहे मार्च २०१९ अखेरचा आर्थिक आढावा.
५. टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट व फायर ऑडिट बाबत माहिती देणे.
६. टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी वसतिगृह इमारत क्र.२ च्या स्ट्रक्चरल ऑडीट बाबत माहिती देणे व ऑडिटमध्ये नमूद केलेल्या बील ऑफ क्वांटिटीजला मान्यता देणे.
७. सन २०१९-२० या वर्षाकरीता टिळक आयुर्वेद महाविद्यालयासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणे व त्यांचा मोबदला ठरविणे.
८. आगामी कार्यक्रमांबाबत माहिती.
९. अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळचे विषय.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

## विषय क्र.९) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे विषय :

१) टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील द्रव्यगुण विभागातील प्राध्यापक पदावर कार्यरत डॉ.संदीप पांडुरंग शिरवळकर यांचा राजीनाम्याबाबत.

२) महाविद्यालयातील संस्थानियुक्त कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत कु.नेहा सुनिल शिंदे यांनी मुदतवाढ व वेतनवाढ करण्याकरीता दिलेल्या अर्जाबाबत.

३) रसशास्त्र विभागातील दुरुस्ती, नूतनीकरण व साहित्य खरेदी इ. करीताच्या जादा झालेल्या रु.२,३७,२७१/- खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.

४) आयुष मिनिस्ट्री ऑफ हेल्थ ॲन्ड सायन्सेस, नवी दिल्ली यांच्या मंजूरीनुसार - "इम्प्लिमेंटेशन ऑफ पूनर्नवादि मण्डूर इन द मॅनेजमेंट ऑफ आयर्न डेफिसिएन्सी ॲनिमिया इन स्कूल गोईंग चिल्ड्रन ॲट मुळशी ब्लॉक" या रिसर्च प्रोजेक्ट करीता मान्यता व "**Anemia Ayush PHI**" या नावाने सिंडीकेट बॅंक, रास्ता पेठ, पुणे येथे स्वतंत्र खाते काढणेसाठी ठराव करणेबाबत.

५) टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या नॅक ॲक्रेडिटेशन करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयाचे व्हिजन व मिशन यांस मान्यता देणेबाबत.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

R.S.M's

# Tilak Ayurved Mahavidyalaya

583/2, Rasta Peth, Pune - 411011.

## Vision And Mission Statement

### Vision

*To be an academic institute of global excellence delivering authentic knowledge of Ayurved with evidence based research and creating academicians, researchers as well as competent health care professionals as family doctors having humanity and sympathy to serve the mankind.*

### Mission

*To create competent Ayurvedic health care professionals with authentic knowledge of Ayurved to deliver their services in an ethical and humanitarian way.*

*To develop Research scholars by imbibing proper amalgamation of Ayurvedic and modern research methods and tools for creating evidence based Ayurved through various research activities and projects.*

*To develop academicians, manufacturers of quality medicines with sound knowledge of Ayurvedic compendia to impart the knowledge in a methodical way for future generation of Ayurved.*

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

# टिळक आयुर्वेद महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समिती सभा क्र. २०१९/१
## गुरुवार, दि.११.०४.२०१९

### * सभावृत्त *

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा क्र. २०१९/१, गुरुवार दि.११.०४.२०१९ रोजी दु.१२.३० वा. महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सभेस पुढील सदस्य उपस्थित होते :-

| | |
|---|---|
| १. डॉ.विजय वि. डोईफोडे | (अध्यक्ष) |
| २. डॉ.सदानंद वि. देशपांडे | (प्राचार्य/सचिव) |
| ३. डॉ.नंदकिशोर बोरसे | (निर्वाचित अध्यापक सदस्य) |
| ४. डॉ.मिहीर हजरनवीस | (निर्वाचित अध्यापक सदस्य) |
| ५. डॉ.सौ.मंजिरी देशपांडे | (निर्वाचित अध्यापक सदस्य) |
| ६. डॉ.दि.प्र.पुराणिक | (पदसिध्द् सदस्य) |
| ७. श्री.संतोष कि. मचाले | (निर्वाचित अध्यापकेतर सदस्य) |
| ८. डॉ.नरेंद्र पेंडसे | (नामनिर्देशित सदस्य) |
| ९. डॉ.योगेश बेंडाळे | (नामनिर्देशित सदस्य) |
| १०. डॉ.भा.कृ.भागवत | (निमंत्रित सदस्य) |
| ११. डॉ.र.ना.गांगल | (निमंत्रित सदस्य) |
| १२. डॉ.सरोज पाटील | (निमंत्रित सदस्य) |

डॉ.संजय गव्हाणे (नामनिर्देशित सदस्य) हे अनुपस्थित होते.

मा.सचिव डॉ.सदानंद वि. देशपांडे ह्यांनी सर्व सदस्यांचे स्वागत केले व मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे ह्यांनी सभेची सूचना वाचली.

विषय क्र. १ ~~बाबत~~ – **मागील सभा क्र.२०१८/५ दि.१५.१२.२०१८ च्या सभावृत्ताचे वाचन व मंजूरी –**

सचिव डॉ.सदानंद वि. देशपांडे ह्यांनी टिळक आयुर्वेद महाविद्यालय समितीच्या दि.१५.१२.२०१८ रोजी झालेल्या सभा क्र.२०१८/५ च्या सभावृत्ताचे वाचन केले.

सभावृत्त सर्वानुमते मान्य करण्यात आले.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

विषय क्र.२ ~~बाबत~~ - टिळक आयुर्वेद महाविद्यालय सभा क्र.२०१८/५ दि.१५.१२.२०१८ रोजी झालेल्या सभेतील निर्णयांवरील कार्यवाहीची माहिती -

सचिव डॉ.सदानंद वि. देशपांडे हयांनी दि.१५.१२.२०१८ रोजी झालेल्या टिळक आयुर्वेद महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या सभा क्र.२०१८/५ मध्ये घेतलेल्या निर्णयांनुसार महाविद्यालयामध्ये टाटा टेलिसर्व्हिसेस (महाराष्ट्र) लिमिटेड या कंपनीची इंटरनेट सेवा घेणे, महाविद्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील स्त्री अध्यापकांचे स्वच्छतागृह, वर्ग क्र.१ शेजारील विद्यार्थ्यांचे स्वच्छतागृह, लेडिज कॉमन रुम शेजारील पुरुष स्वच्छतागृह यांचे नूतनीकरण, महाविद्यालयाच्या मुले व मुलींच्या वसतिगृहामधील कॉटची दुरुस्ती, गंज काढणे, ऑईलिंग करणे, रंग देणे यांपैकी कॉटची दुरुस्ती, गंज काढणे, ऑईलिंग करणे, रंग देणे इ. चा खर्च जास्त होत असल्याने त्याऐवजी नवीन कॉटस् खरेदी करण्यात आली,मुलींच्या वसतिगृहाचे (इमारत क्र.३) चे नूतनीकरण, रसशास्त्र विभागामध्ये आवश्यक टेबल, खुर्च्या व स्टुल यांची खरेदी इ. वरील कार्यवाहीची माहिती दिली.

काही दुरुस्त्यांसह सभेने कार्यवाहीस मान्यता दिली. (परिशिष्ट १)

विषय क्र. ३ ~~बाबत~~ - सभा क्र.२०१८/५ दि.१५.१२.२०१८ नंतरच्या ठळक घटना व सामान्य अहवाल -

सचिव डॉ.सदानंद वि. देशपांडे हयांनी दि.१५.१२.२०१८ नंतरच्या महाविद्यालयातील ठळक घटना व सामान्य अहवालाचे वाचन केले.

सभेमध्ये डॉ.दि.प्र.पुराणिक (सदस्य) यांनी सी.सी.आय.एम. निरीक्षण समितीने अध्यापकांच्या विभागातील बसण्यासाठीच्या जागेबाबत तृटी निदर्शनास आणून दिली आहेत त्यावर विभाग प्रमुख व अध्यापकांना बसण्यासाठी क्युबिकल्स करुन घ्याव्यात असे सुचविले. मा.अध्यक्ष डॉ.वि.वि.डोईफोडे यांनी इंटिरीअर डिझायनर कडून सर्व्हे करुन रिपोर्ट घ्यावा व इंटिरिअर कडून माहिती घ्यावी असे सुचविले.

ठळक घटना व सामान्य अहवालाची सभेने नोंद घेतली. (परिशिष्ट २)

विषय क्र. ४ ~~बाबत~~ - माहे मार्च २०१९ अखेरचा आर्थिक आढावा -

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे हयांनी माहे मार्च २०१९ अखेरच्या आर्थिक अहवालाचे वाचन केले. (परिशिष्ट ३)

सदर आर्थिक अहवालाची सभेने नोंद घेतली.

TIL ... MAHAVIDYALAYA PUNE-11

**विषय क्र. ५ व ६ ~~बाबत~~ - टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट व फायर ऑडिट बाबत माहिती देणे व विद्यार्थिनी वसतिगृह क्र.२ च्या स्ट्रक्चरल ऑडिटबाबत माहिती देणे**

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे हयांनी महाविद्यालयाच्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट व फायर ऑडिटबाबत तसेच विद्यार्थीनी वसतिगृह क्र.२ च्या स्ट्रक्चरल ऑडिटबाबत माहिती सभेस दिली.

महाविद्यालयाची इमारत व विद्यार्थीनी वसतिगृह क्र.२ च्या स्ट्रक्चरल ऑडिट बाबत चर्चा झाली व दोन्हीच्या बिल ऑफ क्वांटिटी फॉर टेंडरींग या अहवालावर सविस्तर चर्चा झाली. या अहवालानुसार विहीत पध्द्तीचा अवलंब करुन टेंडर मागवून राष्ट्रीय शिक्षण मंडळाकडे शिफारस करण्याचे ठरले.

फायर ऑडिटबाबत आलेल्या निविदांनुसार विहीत पध्द्तीने कार्यवाही करावी असे ठरले. याचप्रमाणे वसतिगृहाचेही फायर ऑडिट करुन घ्यावे असे ठरले.

**विषय क्र. ७ ~~बाबत~~ - सन २०१९-२० या वर्षाकरीता टिळक आयुर्वेद महाविद्यालयासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणे व त्यांचा मोबदला ठरविणे.**

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे हयांनी सन २०१९-२० या वर्षाकरीता टिळक आयुर्वेद महाविद्यालयासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणे व त्यांचा मोबदला ठरविणेबाबत माहिती दिली.

सनदी लेखापाल म्हणून मे.एम.बी.कोल्हटकर यांचे नाव सचिव डॉ.सदानंद वि. देशपांडे यांनी सुचविले. त्यास सभेने मान्यता दिली. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव**

टिळक आयुर्वेद महाविद्यालयामध्ये सन २०१९-२० करीता लेखा परीक्षण करण्याकरीता सनदी लेखापाल "मे.एम.बी.कोल्हटकर ॲन्ड कंपनी" यांच्या नियुक्तीस व त्यांची मेहनताना रक्कम रु.४०,०००/-, डेटा प्रोसेसिंग फी रु.४०,०००/- व जिमखाना, विद्यार्थी शासित संघ, प्रगती खाते, डेव्हलपमेंट फंड, प्रोव्हिडंट फंड या पाच खात्यांचे लेखा परीक्षण करण्यासाठी नियुक्त करावे.

सूचक - डॉ.मिहीर हजरनवीस
अनुमोदक - डॉ.सौ.मंजिरी देशपांडे

ठराव सर्वानुमते मंजूर.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

विषय क्र. ८ ~~बाबत~~ - आगामी कार्यक्रमांबाबत माहिती -

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे हयांनी महाविद्यालयाच्या आगामी कार्यक्रमांची पुढीलप्रमाणे माहिती दिली.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयामध्ये नजीकच्या कालावधीतील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या लेखी परीक्षा (ऊन्हाळी २०१९) नॅशनल वर्कशॉप ऑन पंचकर्म - "दृष्यम्" या पंचकर्म विषयातील कार्यशाळेचे पंचकर्म विभाग, टिळक आयुर्वेद महाविद्यालय व सुमतीभाई शाह आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर व धूतपापेश्वर कंपनी लि. यांचेतर्फे रविवार दि.२८.०४.२०१९ रोजी आयोजन याबाबत माहिती दिली.

सदस्यांनी या माहितीची नोंद घेतली.

विषय क्र. ९ बाबत - **मा. अध्यक्षांचे परवानगीने येणारे आयत्यावेळचे विषय** -

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे हयांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने खालील आयत्या वेळचे विषय सभेपुढे मांडले.

९/१ ~~बाबत~~) **टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील द्रव्यगुण विभागातील प्राध्यापक पदावर कार्यरत डॉ.संदीप पांडुरंग शिरवळकर यांचा राजीनाम्याबाबत -**

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे यांनी द्रव्यगुण विभागातील प्राध्यापक डॉ.संदीप पांडुरंग शिरवळकर यांच्या राजीनाम्याबाबत सभेत माहिती दिली. सभेने त्यास मान्यता दिली व अंतिम मान्यतेकरीता राष्ट्रीय शिक्षण मंडळाकडे पाठवावी असे ठरले.

९/२ ~~बाबत~~) **टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील संस्थानियुक्त कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत कु.नेहा सुनिल शिंदे यांनी मुदतवाढ व वेतनवाढ करण्याकरीता दिलेल्या अर्जाबाबत-**

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे यांनी टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील संस्थानियुक्त कनिष्ठ लिपीक पदावर कार्यरत कु.नेहा सुनिल शिंदे यांनी मुदतवाढ व वेतनवाढ करण्याकरीता दिलेल्या अर्जाबाबत माहिती दिली. * शिफारस करुन ठराव राष्ट्रीय शिक्षण मंडळाकडे मान्यतेसाठी पाठवावा असे सभेत ठरले.

*कु.नेहा शिंदे यांना मुदतवाढ व वेतनवाढ द्यावी अशी

९/३ ~~बाबत~~) **रसशास्त्र विभागातील दुरुस्ती, नूतनीकरण व साहित्य खरेदी इ. करीताच्या जादा झालेल्या रु.२,३७,२७१/- खर्चास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत -**

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे यांनी टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील रसशास्त्र विभागातील दुरुस्ती, नूतनीकरण व साहित्य खरेदी इ. करीताच्या जादा झालेल्या रु.२,३७,२७१/- खर्चाबाबत माहिती दिली. या जादा झालेल्या रु.२,३७,२७१/- खर्चास सभेने कार्योत्तर मान्यता दिली.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

**९/४ बाबत) आयुष मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अॅन्ड सायन्सेस, नवी दिल्ली यांच्या मंजूरीनुसार - "इम्प्लिमेंटेशन ऑफ पूनर्नवादि मण्डूर इन द मॅनेजमेंट ऑफ आयर्न डेफिसिएन्सी अॅनिमिया इन स्कूल गोईंग चिल्ड्रन अॅट मुळशी ब्लॉक" या रिसर्च प्रोजेक्ट करीता मान्यता व "Anemia Ayush PHI" या नावाने सिंडीकेट बॅंक, रास्ता पेठ, पुणे येथे स्वतंत्र खाते काढणेसाठी ठराव करणेबाबत –**

आयुष मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अॅन्ड सायन्सेस, नवी दिल्ली यांच्या मंजूरीनुसार - "इम्प्लिमेंटेशन ऑफ पूनर्नवादि मण्डूर इन द मॅनेजमेंट ऑफ आयर्न डेफिसिएन्सी अॅनिमिया इन स्कूल गोईंग चिल्ड्रन अॅट मुळशी ब्लॉक" या रिसर्च प्रोजेक्ट करीता सभेने मान्यता दिली. तसेच "Anemia Ayush PHI" या नावाने सिंडीकेट बॅंक, रास्ता पेठ, पुणे येथे स्वतंत्र खाते काढणेसाठी खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

## Resolution :

Tilak Ayurved Mahavidyalaya Samiti in its meeting held on Thursday, 11th April 2019 resolves to open a new Saving Bank Account in the name of **"Anaemia Ayush PHI"** in Syndicate Bank, Rasta Peth, Pune branch and further resolves that this saving bank account should be operated by any two of following office bearers:

1) Dr. V.V.Doiphode - President (Rashtriya Shikshan Mandal, Pune)
2) Dr. D.P.Puranik - Secretary (Rashtriya Shikshan Mandal, Pune)
3) Dr. S.V.Deshpande - Principal (Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune) & Project Head
4) Dr. Asmita U. Jadhav - Project Incharge

**९/५ बाबत) नॅशनल सेमिनार ऑन "लाईफ स्टाईल डिसऑर्डर्स" या शारीरक्रिया विभागातील सेमिनारचे "Life Style Disorders 2019" या नावाने सिंडीकेट बॅंक, रास्ता पेठ, पुणे येथे स्वतंत्र खाते काढणेसाठी ठराव करणेबाबत –**

नॅशनल सेमिनार ऑन "लाईफ स्टाईल डिसऑर्डर्स" या शारीरक्रिया विभागातील सेमिनारचे "Life Style Disorders 2019" या नावाने सिंडीकेट बॅंक, रास्ता पेठ, पुणे येथे स्वतंत्र खाते काढणेसाठी खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

## Resolution :

Tilak Ayurved Mahavidyalaya Samiti in its meeting held on Thursday, 11th April 2019 resolves to open a new Saving Bank Account in the name of **"Life Style Disorders 2019"** in Syndicate Bank, Rasta Peth, Pune branch and further resolves that this saving bank account should be operated by any two of following office bearers:

1) Dr. V.V.Doiphode - President (Rashtriya Shikshan Mandal, Pune)
2) Dr. D.P.Puranik - Secretary (Rashtriya Shikshan Mandal, Pune)
3) Dr. S.V.Deshpande - Principal (Tilak Ayurved Mahavidyalaya, Pune)
4) Dr. Minakshi A. Ranadive - Organizing Secretary

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

९/६ ~~बाबत~~) टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या नॅक ॲक्रेडिटेशन करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयाचे व्हिजन व मिशन यांस मान्यता देणेबाबत -

सचिव डॉ.सदानंद वि.देशपांडे यांनी महाविद्यालयाच्या नॅक ॲक्रेडिटेशन करुन घेण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यालयाचे व्हिजन व मिशन याबाबत माहिती दिली.

व्हिजन व मिशन यास दुरुस्त्यांसह सभेने मान्यता दिली.

मा. अध्यक्ष व उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून सभा समाप्त झाली.

वाचून सर्वानुमते मान्य

डॉ. वि. वि. डोइफोडे
अध्यक्ष
२१।६।२०१८.

सचिव / प्राचार्य
Principal,
Tilak Ayurved Mahavidyalaya
Pune.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

Principal
Tilak Ayurved Mahavidyalaya
Pune

## Tilak Ayurved Mahavidyalaya
## Rasta Peth, Pune-411011

---

## Vision Mission

### Vision

To be an academic Institute of global excellence delivering authentic knowledge of Ayurved with evidence based research and creating academicians, researchers as well as competent health care professionals as family doctors having humanity and sympathy to serve the mankind.

### Mission

- To create competent Ayurvedic health care professionals with authentic knowledge of Ayurved to deliver their services in an ethical and humanitarian way.
- To develop Research scholars by imbibing proper amalgamation of Ayurvedic and modern research methods and tools for creating evidence based Ayurved through various research activities and projects.
- To develop academicians, manufacturers of quality medicines with sound knowledge of Ayurvedic compendia to impart the knowledge in a methodical way for future generation of Ayurved.

TILAK AYURVED MAHAVIDYALAYA PUNE-11

Principal
Tilak Ayurved Mahavidyalaya
Pune